N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** लक्ष्मीपूरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0007 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/01/2024 01:37

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 06/12/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 02/01/2024

**Time From (वेळेपासून):** 18:58 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 03/01/2024 **Time (वेळ):** 01:37 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 006

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/01/2024 01:37 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख,कोल्हापूर कार्यालय व परिसर,कोल्हापूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पंडीत रंगराव बेनाडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1981

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोहाळे तर्फे आळते,तापन्हाळा, ,कोल्हापूर,लक्ष्मीपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोहाळे तर्फे आळते,तापन्हाळा, ,कोल्हापूर,लक्ष्मीपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुदाम दादाराव जाधव | | | 1. 303,पुण्यप्रवाह सोसायटी,, नागळा पार्क, डायमंड,हस्पीटल जवळ, कोल्हापूर,लक्ष्मीपूरी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | उदय लगमाना शेळके | | | 1. कणेरीवाडी,, ता करवीर,,जि कोल्हापूर,लक्ष्मीपूरी,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या 30 भारतीय चलनी नोटा | 15,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

15,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 03/01/2024

मी पंडीत रंगराव बेनाडे, वय - 43 वर्षे, व्यवसाय - शेती, रा. पोहाळे तर्फे आळते, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर मो.नं. - 9850513958 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 06/12/2023 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस उपअधीक्षक श्री.सरदार नाळे यांना समक्ष भेटुन माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सागितली की, माझी पोहाळे तर्फे आळते गावात भूमापन सर्व्हे नं.191 मधील गट क्रमांक 191 मध्ये 10 गुंठे शेतजमीन आहे. ती आमचे मालकीचे वडीलार्जीत जमीनीची मालकीची असुन नजरचुकीने चुलत चुलते यांचे नावे लागली होती ती कमी करण्याकरीता म्हणजेच शेतीबाबतचा फाळणी उतारा (पोट हिस्सा) दुरूस्त करून आमचे मालकीची शेतजमीन माझेसह अन्य सह हिस्सेदार यांच्या नावे लागणेकरता आम्ही उपसंचालक भूमी अभिलेख पुणे या प्रादेशिक कार्यालयाकडे 2018 मध्ये अर्ज केला होता. आमचे प्रलबिंत अर्जाची सुनावणी भुमी अभिलेख अधीक्षक कोल्हापूर यांच्या समक्ष सुरू करणेबाबत उपसंचालक यांनी आदेशीत केले होते. त्याप्रमाणे सदर अपील अर्जाची सुनावणी मे. जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख जाधव साहेब यांचे समोर होवुन सदर अपीलाचे सुनावणीचा जो काय निर्णय असेल तो तुम्हाला कळविला जाईल असे आम्हाला सांगितले होते. सदर अपिलाचे कामाबाबत मी पाठपुरावा करीत होतो. तक्रारदार यांचे अपिलाचे काय निर्णय झाला याबाबत मी जिल्हा भुमी अभिलेख कोल्हापूर कार्यालयात जाधव साहेबांना भेटणेस गेलो असता तेथे चालक म्हणुन नेमणुकीस असलेला उदय शेळके हा मला भेटुन आमचे कामाबाबत माहिती घेतली. त्यानंतर चालक उदय शेळके याने मला जाधव साहेबांना बोललो आहे, तुमचे काम पुर्ण करून देणेसाठी जाधव साहेबांना बंद पाकीटातुन पंधरा हजार रूपये दयावे लागतील तसेच माझेही काहीतरी बघावे लागेल असे म्हणाले त्यावेळी त्यांना मी कायतरी अॅडजस्ट करा असे म्हणालो त्यावेळी उदय याने साहेबांचे साठी 10,000/- रूपये दया व त्यांचेसाठी 5,000/- हजार रूपये दया असा असे म्हणुन माझेकडे लाच मागणी केली. त्यावेळी मी त्यांना एक आठवडाभरात पैशाची जुळणा करून भेटतो असे सांगुन तेथुन निघुन आलो आहे. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन तक्रार सागुन मी दि.06/12/2023 रोजी सायंकाळी 04.00 वा चे सुमारास त्यांना भेटण्यास जाणार असल्याचे सांगितले. त्यावेळी नाळे साहेबांनी त्यांचे ऑफिसकडील पोलीस निरीक्षक बापु साळुंके यांना बोलावुन घेवुन माझे तक्रारीवर कारवाई करणेबाबत सांगितले. त्यानंतर मी साळुंके साहेब यांना माझी तक्रार सांगुन त्यांचेकडे तक्रारी अर्ज दिला. त्यानंतर साळुंके साहेबांनी लागलीच दोन पंचाना बोलावुन घेतले. त्यानंतर आमची दोन्ही पंच, स्टाफ सोबत ओळख करून दिली. त्यावेळी मी त्यांना वरील तक्रार सांगितली. त्यानंतर साळुंके साहेबांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डरची संपुर्ण माहिती आम्हांला देवुन जिल्हा भुमी अभिलेख कोल्हापूर या कार्यालयातील मे. जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख, जाधव साहेब व त्यांचा चालक उदय यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी बाबत आवश्यक सुचना दिल्या त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 यांना जाधव साहेब व उदय यांना भेटणेकरीता पाठविले. मी जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालयाजवळ जावुन चालक उदय यांना फोन लावला असता त्यांनी तो बाहेर असुन काही वेळाने येत असल्याचे सांगितले. तो आलेनंतर आमचेत कामाबाबत बोलणे झाले त्यावेळी उदय यांनी मला आता दहा पाकीटात घालत नव्ह... दोन पाकीट वेगळी केली नव्ह... दहाच आणि पाच... असे म्हणाला. त्यावेळी मी त्यांना तुम्ही बोललासा पण लक्षात नाय, आठवत नाय... असे म्हणालो. त्यावेळी उदय याने पंधरा सांगितले ना तुम्हाला... असे म्हणाला.त्यावेळी मी हां हां... असे म्हणालो त्यावेळी उदय

याने दयायला लागतय दुसरी पार्टी पण जोर खायला लागलीया तुमच्या प्रकरणात असे म्हणाला. त्यावेळी मी त्यांना साहेबांना भेटुया असे म्हणालो त्यावेळी तो साहेबांना भेटायच तर भेटा असे म्हणुन साहेबांना भेटताना कसे बोलायचे याबाबत आमचेत बोलणे झाले. त्यानंतर मी व उदय असे जाधव साहेबांकडे गेलो. त्यावेळी उदय याने जाधव साहेबांना माझे कामाचा विषय सांगितला त्यावेळी जाधव साहेब यांनी फाईल कोठे आहे असे विचारले असता उदय याने फाईल हाय असे म्हणाला त्यानंतर जाधव साहेबांनी फाईल बघुया की... काय टेन्शन घेता असे म्हणाले. त्यावेळी मी जमीनीचा सर्व्हे नंबर चुकीमुळ झालय ते असे म्हणालो. त्यावेळी जाधव साहेब यांनी ते बघुया की करूया असे म्हणाले. त्यावेळी उदय यांनी फाईल बघुया शुक्रवारी सांगा... असे म्हणला त्यावेळी मी मग ते काय... असे म्हणालो त्यावेळी उदय यांनी मला जाधव साहेबांचे केबीन मधुन बाहेर घेवुन येवुन ते कोर्ट आहे तेथे असले बोलुन चालत नाही असे म्हणाला. त्यावेळी उदय याने ते नव्ह दहा पाकीटात घाला आणि आणा, साहेबांच्या समोर ठेवायच... लगेच बाहेर यायच... काय बोलायच नाही... त्यावेळी असे म्हणाला. त्यावेळी मी त्यांना येतो शुक्रवारी असे सांगुन तेथुन निघुन मी व पंच नं.01 साहेब थांबलेल्या ठिकाणी परत येवुन साहेबांना सर्व हकीकत सांगितली. त्यानंतर चालक उदय यांनी शुक्रवारी येण्यास कळविल्याने चालु कारवाई साळुंके साहेबांनी थांबवुन मला दि. 08/12/2023 रोजी करण्याचे सांगुन सकाळी 09.30 वाजता ऑफीसला येण्यास सांगितले.

दिनांक 08/12/2023 रोजी सकाळी 09.40 वा चे सुमारास साळुंके साहेब थांबलेल्या ठिकाणी आलो. त्यावेळी साळुंके साहेबांनी जिल्हा भुमी अभिलेख कार्यालयातील जाधव साहेब यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने आणखीन पडताळणी करणेकरीता आवश्यक सुचना देवुन जाधव साहेब यांची भेट घेणेकरीता पाठविले. मी कार्यालयात जावुन जाधव साहेब यांना भेटलो. त्यावेळी मी त्यांना उदय शेळके यांचेबरोबर येवुन भेटलो होतो व माझे कामाबाबत सांगितले. त्यावेळी जाधव साहेब यांनी उदय काय म्हटला... असे म्हणाले त्यावेळी मी पंधरा हजार करा म्हटला... असे म्हणालो त्यावेळी जाधव साहेब हा असे म्हणाले त्यावेळी मी हे करून घेवुया म्हटल असे म्हणालो त्यावेळी जाधव साहेब दिले... असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना नाही काय तरी अॅडजस्ट करा थोड फार असे म्हणालो. त्यावेळी जाधव साहेब यांनी व्हय... असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना एक पंधरा हजार त्यान सांगितल... असे म्हणालो. त्यावेळी जाधव साहेब हं... उदयला विचारलेले बर... असे म्हणाले त्यानंतर त्यांनी मला बाहेर थांबा उदय आलेनंतर दोघांना समोर घेतो असे म्हणाले. त्यावेळी मी जाधव साहेब यांचे केबीन मधुन बाहेर येवुन थांबलो त्यानंतर उदय आलेनंतर मी त्याला जाधव साहेबांना भेटल्याचे सांगितले. त्यावेळी उदय याने किती आणलासा असे म्हणाला त्यावेळी मी पंधरा हजार तुम्हीच चला जरा आणि काय तरी रिक्व्ेस्ट करा काय तरी... असे म्हणालो. त्यावेळी आमचेत पैशाबाबत बोलणे झाले त्यावेळी उदय याने किती करायच दहा घातलासा का? पाकीटात असे म्हणाले त्यावेळी मी दहा करतो पाकीटात असे म्हणालो त्यावेळी उदय यांनी आणि माझ मग काय... असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना साहेबांना भेटलो असुन मी त्यांना पंधरा हजार बोललो आहे असे सांगितले. त्यावेळी उदय याने पाकीटात दहा हजार घाला त्यानंा म्हणायच माझेकडे एवढी काय व्यवस्था झाली नाही असे म्हणा असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना एटीएम वरून पैसे काढुन येतो असे म्हणालो त्यावेळी त्यांनी सावकास या असे म्हणाला. त्यानंतर मी,पंच नं.1 असे साहेब थांबलेल्या ठिकाणी परत येवुन साहेबांना घडलेली हकीकत सांगितली.

त्यानंतर साळुंके साहेबांनी सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अंथ्रासिन लावलेले 15,000/- रूपये पैकी जाधव साहेब यांना देण्यासाठीचे 10,000/- रूपये एका पाकीटात व उदय याला देण्यासाठी 5,000/- रूपये एका पाकीटात घालुन दोन्ही पाकीटे माझ्या शर्टच्या डावे खिशात ठेवुन मी पंचासह भेटणेस गेलो. त्यावेळी माझे पाठोपाठ पंच नं.02, सापळा पथक ही आले. मी भुमी अभिलेख कार्यालयात गेलो त्यावेळी तेथे जाधव साहेब नव्हते म्हणुन मी तेथे विचारणा केली असता जाधव साहेब व त्याचा चालक उदय हे गगनबावडा येथे गेले असुन जाधव साहेब सोमवारी येणार आहेत. त्यानंतर मी उदय याला फोन केला असता उदय याने तो गगनबावडयाला चालला असुन ड्रायव्हिंग करत असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही सर्वजण पुर्वी थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेथे मी साहेबांना हकीकत सांगितली. जाधव साहेब हे सोमवारी कार्यालयात येणार असल्याने चालु कारवाई साळुंके साहेबांनी थांबवुन मला दिनांक 11/12/2023 रोजी करण्याचे सांगुन सकाळी 10.10 वाजता ऑफीसला येण्यास सांगितले.

दिनांक 11/12/2023 रोजी साळंुके साहेबांनी सापळा कारवाई आयोजीत केली होती परंतु त्या दिवशी चालक उदय हा दिनांक 20/12/2023 नंतर येणार असलेने चालु कारवाई साळुंके साहेबांनी थांबवुन मला दिनांक 21/12/2023 रोजी करण्याचे सांगुन सकाळी 10.40 वाजता ऑफीसला येण्यास सांगितले. त्यानंतर मला उदय याचा फोन आला की मी 20 तारखेपर्यंत रजेवर असुन साहेबांना भेटु नकोस मी आल्यावर भेटु असे सांगितले. सदरच्या फोनबाबत मी साळुंके साहेबांना सांगितले. दिनांक 21/12/2023 रोजी साळंुके साहेबांनी सापळा कारवाई आयोजीत केली होती परंतु जाधव साहेब हे 1 जानेवारी नंतर येणार आहेत तसेच उदय ही ऑफीसला

नसल्याने चालु कारवाई साळुंके साहेबांनी थांबवुन मला दि.02/01/2024 रोजी करण्याचे सांगुन सकाळी 13.00 वा ऑफीसला येण्यास सांगितले.

त्यानंतर मी दिनांक 02/01/2024 रोजी सकाळी 13.00 वा चे सुमारास साळुंके साहेब थांबलेल्या ठिकाणी आलो. साळंुके साहेबांनी सापळा कारवाई आयोजीत केली यापुर्वी अंॅथ्रासिन लावलेले 15,000/- रूपये पैकी जाधव साहेब यांना देण्यासाठीचे 10,000/- रूपये एका पाकीट पॅन्टचे उजव्या खिशात व उदय याला देण्यासाठी 5,000/- रूपये एका पाकीटात घालुन ते पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवुन मी पंचासह त्यांना भेटणेस गेलो. त्यावेळी माझे पाठोपाठ पंच नं.02, सापळा पथक ही आले. मी भुमी अभिलेख कार्यालयात गेलो तेथे जाधव साहेब त्यांचे केबीन मध्ये होते व तेथे पक्षकार यांच्या सुनावण्या चालु होत्या. त्यानंतर माझे उदय सोबत कामाचे अनुषंगाने बोलणें झाले त्यानंतर त्याने मला बाजुला चल असे म्हणाला त्यानंतर उदय व मी माझे मोटर सायकल वरून ऑफीसकडे येणा-या रोडवरती आलो. तेथे उदय याने माझेकडे जाधव साहेब व त्याचे करीता असे दोघांचे पैसे मागितले. त्यावेळी मी त्याला माझ्या कामाबाबत जाधव साहेब यांना भेटुन बोलणार असुन त्यांनतरच त्यांचे पैसे मी त्यांना देणार आहे असे बोलल्याने उदय याने मला परत ऑफीस आवारात आणलेे. परंतु त्यावेळी दुपारच्या जेवणाची सुट्टी झाल्याने मी थांबुन राहीलो. तेवढयात जाधव साहेब त्यांचे केबीन मध्ये आल्याने मी व उदय त्यांना लगेच भेटलो त्यावेळी मी जाधव साहेबांना माझ्या कामाबाबत बोलुन त्यांनी उदय यांचे मार्फतीने सांगितलेले 10,000/- रूपये आणल्याचे सांगुन त्यांनी ते 10,000/- माझेकडुन घेवुन जा ठिक आहे... असे म्हणुन मी दिलेले 10,000/- रूपये त्यांनी टेबलचे ड्रावर मध्ये ठेवले. त्यानंतर मी व उदय त्यांचे केबीन मधुन बाहेर आलो. त्यावेळी पुन्हा उदय याने मला ऑफीसचे बाहेरील रस्त्याकडेला घेवुन गेला असता उदय याने त्याच्यासाठी मागणी केलेले 5,000/- रूपये हाताने इशारा करून माझ्याकडे मागितले. त्यावेळी मी उदय याला 5,000/- रूपये दिले असता त्याने ते पैसे घेवुन त्याच्या पॅन्टचे खिशात ठेवले. त्यानंतर आम्ही दोघे पुन्हा कार्यालयाजवळ आलो. त्यानंतर मी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर लगेच सापळा पथक तेथे आले लागलीच साळुंके साहेबांचे स्टाफमधील सापळा पथकातील दोन अंमलदार यांनी सदर ठिकाणी येवुन स्विकारलेल्या लाच रक्कमेसह चालक उदय यांना पकडले. तसेच नाळे साहेब, साळुंके साहेब व उर्वरीत स्टाफ यांनी जाधव साहेब यांना स्विकारलेल्या लाच रक्कमेसह पकडले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या करून पुढील सर्व कार्यवाही ही अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे पुर्ण केली.

तरी मी व माझे सह हिस्सेदार यांचे पोहाळे तर्फे आळते गावात भूमापन सर्व्हे नं.191 मधील गट क्रमांक 191 मध्ये 10 गुंठे वडीलार्जीत शेतजमीन असुन सदर शेतजमीनीबाबत मी मे. जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख यांच्याकडे अपिल दाखल केले होते त्याबाबत जाधव साहेब, जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख यांचे समोर झाली असुन मी दाखल केले अपिलाचा निर्णय माझे बाजुन लावुन कामपुर्ण करून देणेसाठी जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख जाधव यांचे चालक उदय शेळके याने माझेकडे जाधव साहेब यांचेसाठी 10,000/- रूपये व स्वतःसाठी 5,000/-रूपये अप्रामाणिकपणे स्वतःचे फायदयाकरीता मागणी केली तसेच जाधव साहेब यांनी चालक उदय याने सांगितलेप्रमाणे त्याला पैसे दिले...असे म्हणुन उदय याने माझेकडे केलेल्या लाच मागणीस अप्रामाणिकपणे स्वतःचे फायदयाकरीता संमती दिली तसेच जाधव साहेब यांनी माझेकडुन बेकायदेशीरपणे 10,000/- रूपये व चालक उदय शेळके याने बेकायदेशीरपणे 5,000/- रूपये लाच स्विकारताना त्यांना अॅन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर कडील पथकाने रंगेहाथ पकडल्याने माझी 1) सुदाम दादाराव जाधव, वय - 50 वर्षे, जिल्हा अधीक्षक, जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख, कोल्हापूर वर्ग - 1, सद्या रा. पुण्यप्रवाह सोसायटी, प्लॅट नं.303, नागळा पार्क, डायमंड हॉस्पीटल जवळ, कोल्हापूर, मुळ रा. खामसवाडी, ता.कळंब, जि.धाराशिव 2) उदय लगमाना शेळके, वय- 40 वर्षे, वाहन चालक, जिल्हा भुमी अभिलेख कार्यालय कोल्हापूर वर्ग - 3, रा. कणेरीवाडी, ता. करवीर, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली असता ती खरी व बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): minakshi sandeep patil

**Rank** (पद): HC (Head Constable) **No.**(क्र.): 100

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

HC592
ठाणे अंमलदार
लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे

**Signature of Officer incharge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Avinash Bhupal Kavl

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PBMH77100